भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षाचे औचित्य साधुन " पाली-तिपिटक" चे मराठी भाषांतर करण्या संबधात समितीचे गठन करण्याबाबत .

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बैठक-२०१५/प्र.क्र.१३१/बांधकामे

कक्ष क्र.१४०, पहिला मजला, मंत्रालय विस्तार,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग
मुंबई- ४०० ०३२
तारीख: १३जानेवारी,२०१६

वाचा :-

१) **महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्र.बार्टी/पाली/तिपिटक/२०१५-१६/१७४६, दिनांक १ऑगस्ट,२०१५**

प्रस्तावना :-

१. पाली ही भारतातील एक प्राचिन भाषा आहे. भगवान गौतम बुध्दांची शास्त्रीय, तर्कसंगत व मानवी मुल्यांवर आधारीत अशी शिकवण पाली भाषेतील समृध्द साहित्यात जतन करुन ठेवण्यात आली आहे. भगवान बुध्दांनी त्यांच्या संदेश सर्वसामान्य माणसांच्या भाषेत दिलेला असुन, त्यांचा वैज्ञानिक व मानवी उपदेश पाली तिपिटकामध्ये उपलब्ध आहे. या साहित्याच्या अभ्यासाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना बौध्द धर्माच्या रुपात सामाजिक सुधारणांचा नवा मार्ग चोखाळण्याची प्रेरणा मिळाली. याच पाली साहित्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही आपल्याच मातीत रुजलेली मुल्ये आढळुन आली. भगवान बुध्दांच्या उपदेशातुन प्रतिबिंबीत झालेले स्वातंत्र्य, समता व बंधुतेचे तत्वज्ञान हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्य घटनेच्या मुलभूत तत्वांमध्ये स्पष्ट केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, राजकीय व धार्मिक तत्वज्ञान याच साहित्याने प्रभावित झाल्याचे दिसून येते. भगवान गौतम बुध्दांनी उपदेशिलेला मध्यम मार्ग लोकप्रशासनामध्ये अंमलात आणल्यास उत्तरदायी, पारदर्शक, सर्वसमावेशक, कार्यकुशल आणि संवेदनशील असे उत्तम प्रशासन सहजसाध्य होण्यास मदत होईल. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठातील पाली विभाग हा पाली भाषा व बौध्द अध्ययनाच्या क्षेत्रातील अध्यापन व संशोधनाचे एक प्रमुख केंद्र आहे. तथापि, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाच्या पाली भाषा विभागामार्फत

तिपिटकाच्या मराठी भाषांतराचा उपक्रम राबविणे अद्याप शक्य झालेले नाही. भगवान बुध्दांच्या शिकवणुकीचे सखोल संशोधन होण्यासाठी पाली ग्रंथाचे मराठी भाषांतर होणे व भगवान बुध्दांचा नष्ट झालेला साहित्यिक तसेच सांस्कृतिक वारसा भारतात पुन्हा प्रस्थापित करणे आवश्यक आहे. या करीता विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी, इगतपुरी यांनी प्रकाशित केलेल्या पाली तिपिटकातील सुत्तपिटक, विनयपिटक व अभिधम्मपिटकाचे मराठी भाषांतराचा उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे. पाली तिपिटकाचे मराठीत भाषांतर करणे बाबतचा विषय हा संवेदनशील असल्याने, या विषयाबाबत उचित निर्णय घेणकरीता राज्यस्तरीय समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती..

शासन निर्णय:-

२. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या १२५ व्या जयंती वर्षाचे औचित्य साधुन पाली तिपिटकाचे मराठीत भाषांतर करणेबाबत उचित निर्णय घेणकरीता खालील प्रमाणे “राज्य स्तरीय समिती” गठीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.:-

अ.क्र.	पदनाम	समितीतील पदनाम
१	मा. मंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
२	मा. प्रधान सचिव , सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,	सदस्य
३	मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई	सदस्य
४	मा.प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई	सदस्य
५	मा. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे	सदस्य
६	मा. कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ, पुणे	सदस्य
७	महासंचालक,डॉ.बाबसाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे	सदस्य
८	निबंधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे	सदस्यसचिव
९	ॲड गौतम चाबुकस्वार, विधानसभा सदस्य, पिंपरी, पुणे	सदस्य

३. वरील राज्यस्तरीय समितीच्या बैठकीमध्ये डॉ.धनजंय चौहाण, बौध्द अभ्यासक, विभाग प्रमुख, पाली भाषा विभाग, साविव्रिबाई फुले पुणे विद्यापिठ, पुणे व विभागप्रमुख, पाली बुध्दीस्ट विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ यांचा विषय तज्ञ म्हणून समावेश करुन त्यांना वेळोवेळी बैठकीकरीता विशेष निमंत्रित म्हणून बोलाविण्यात येईल.

४. वरील राज्यस्तरीय समितीने पाली तिपिटक मधील निश्चित कोणत्या ग्रंथाचे मराठीत भाषांतर करावे याचा प्राधान्य क्रम ठरविणे, प्रकल्पाची रुपरेषा ठरविणे, प्रकल्प पुर्ण करण्याचा कालावधी निश्चित करणे व प्रकल्पाच्या खर्चास मंजूरी देणे इ. बाबी संबधातील निर्णय घेण्याचे अधिकार समितीस राहतील.

५. राज्यस्तरीय समितीने या संदर्भातील अहवाल तीन महिन्यात शासनास सादर करावा.

६. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०१६०११३१२४२१२६७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Haridas Wade

Digitally signed by Chandrakant Haridas Wade
DN: c=IN, o=SJ And SA, ou=Government Of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, cn=Chandrakant Haridas Wade
Date: 2016.01.13 18:18:57 +05'30'

(चंद्रकांत ह. वडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,
१) मा.मंत्री, सा.न्या.व वि.स. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.राज्यमंत्री, सा.न्या.व वि.स. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३) मा.ॲड गौतम चाबुकस्वार, विधान सभा सदस्य,नालंदा, डिलक्स चौक, पिंपरी, पुणे-१७
४) प्रधान सचिव, सा.न्या.व वि.स.वि.यांचे वरिष्ठ सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
५) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) प्रधान सचिव, मराठी भाषा विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई-३२
७) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
८) कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
९) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१०) निबंधक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
११) मा.प्रधान सचिव, सा.न्या.व वि.स.वि.यांचे वरिष्ठ सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
१२) निवडनस्ती.